PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 3

# ख्रिस्ती धर्म आणि त्याची आध्यामिक तत्वे

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विध्यार्थी
सामाजिक शास्त्रे प्रशाळा,
इतिहास विभाग, कबचौउमवि, जळगाव,
**(महाराष्ट्र) भारत**

***"देवाचे वचन सत्य आहे आणि ते बंधमुक्त करते"अख्रिस्ती व्यक्ती अज्ञान, चुका, पाप, नियम आणि अंधश्रद्धा या भयंकर बंधनात अडकतात, पण ज्यांना येशू ख्रिस्त खराच समजला ते पापापासून मुक्त होतात, प्रकाशात चालतात आणि देवाच्या आत्म्याच्या प्रेरणेने चालतात. ''***

## प्रस्तावना:-

मी कोणत्या मंडळीत सामील व्हावे परंतु आता तुम्ही हे विचाराल 'मी कोणत्या मंडळीत जावे' ह्याचे योग्य उत्तर देवाच्या वचनाशिवाय कोठेही आढळणार नाही, पवित्रशास्त्र तुम्हांस मार्गदर्शन करील व तुम्हांस स्थानिक मंडळी कोठे आहे दाखवील की जेथे विश्वासणाऱ्याची मदत लाभेल, या जगात ख्रिस्ताच्या अस्तित्वाचा आनंद इतर ख्रिस्ती जणांच्या सहवासात व सहभागीतेत व ज्या मंडकीत तुम्ही जावे यावर अवलंबून आहे. "("**जॉन रीची")** देवाची मंडळी ही देवाच्या राज्याची प्रतिछाया, आणि ख्रिस्ताची प्रतिबिंब आहे. ज्या मंडळीत स्वतः देवाचा वास आहे. आणि जी पवित्रशास्त्र आणि पवित्र आत्म्याचा मार्गदर्शनाखाली संचालित होत असते, ज्यात पाळकांची हुकूमशाही नाही तर ख्रिस्ताची सार्वभौमकता आहे. ख्रिस्त शीर आहे तर पाळक, विश्वासी, उपदेशक, प्रेषित, भविष्यवक्ता, शिक्षक, हे त्याचे प्रमुख अंग आहे. देवाच्या मंडळीत सर्व लोकानी आत्म्याचा एकच प्याला पिललेला असून. वचनाने ते रोज तृप्त होत असतात. मंडळींचा नागरिक हा पवित्र असून त्याचे परिपूर्ण तारण झालेले असते. मी कोणत्या मंडळीत सामील व्हावे, ख्रिस्त सांगतो मी माझी मंडळी खडकावर (पेत्रावर )स्थापिन आणि अंधकाराचे अधिकार त्यावर वहन होणार नाही. (मत्ताय 16:18) देवाच्या मंडळीवर अंधकारांच्या शक्तीचे काहीही चालणार नाही, जी मंडळी या वचनाच्या कसोटीवर उतरते त्या मंडळीत आपण

सामील होऊ शकतात. मंडळींचा शीर ख्रिस्त आहे. आता काही मंडळीत पाळक हा शीर बनून बसलेला आहे, अधिकारप्राप्तीची सर्व सूत्रे तो संचालित करतो. आशा मंडळीत जर विश्वाशी लोकांचा स्वातंत्र्यावर गदा येत असेल तर ती मंडळी ख्रिस्ताची नाही. जी मंडळी ट्रीनिटी आणि तसेच पवित्रशास्त्र वचनाची पायमल्ली करून आपले अस्तित्व भौतिकरित्या संचालित करत असते, ती मंडळी आपल्या खोट्या तत्त्वांनी भरलेली असून तिला देवाचा, पवित्र आत्म्याचा आणि शास्त्राचा आधार नाही. ती खोट्या पंथाची जननी आहे. त्या मंडळी पासून दूर राहा. ख्रिस्ताची मंडळी ख्रिस्तात पूर्ण आहे आपल्या अस्तित्वात नाही.

**जन्मांध आंधळा आत्मिक पुढाऱ्यांना ज्ञान देतो:-**

"जन्मांध असलेला आत्मिक दृष्टीने परिपूर्ण, पण धर्मपुढारी ज्यांनी नियमशास्त्र संपूर्ण वाचला त्यांनी ख्रिस्ताला ओळखले नाही. ते आत्मिक दृष्ट्या आंधळे होते. * (संदेश समजण्यासाठी-योहांनकृत शुभवर्तमान 9 वा अध्याय संपूर्ण वाचलेला बरा) म्हणून आंधळा यहुदी पुढाऱ्यांना दोष देऊन म्हणतो. "तुम्ही लोक इस्राएलचे प्रमुख आहात, यहूद्यांचे शिक्षक आहात, तुम्हामध्ये एक असा आहे की जो आंधळ्याला दृष्टी देतो आणि तो कोठून आला हे तुम्हाला माहीत नाही. तुमच्या धिक्कार असो**.** **"विलियम मैकडोनाल्ड**. खरे पाहता आज काही मंडळीत पाळकापेक्षा विश्वाशी लोकांची आत्मिक दृष्टी खोल आहे, पवित्रशास्त्रचे ज्ञान जास्त आहे, जीवन स्वच्छ आहे, ख्रिस्तासाठी जगणे आणि मरणे जास्त आहे. पण जन्मांधा प्रमाणे हे विश्वाशी देखील फक्त यरुसलेमच्या मंदिराप्रमाणे सदस्य आहे, ज्यांनी ख्रिस्ती पुढाऱ्यांन विरोधात उठाव केला तर. त्यांना जन्मांध प्रमाणे मंदिरातून(चर्चमधून)बहिस्कृत करण्यात येते, अथवा अंधश्रद्धाच्या माध्यमातून भय देण्यात येते, ख्रिस्तविरोधी म्हणून संबोधले जाते. पण जो ख्रिस्ती यातून बंधमुक्त होतो तो ख्रिस्ताचा सत्यात विलीन होतो, आणि ख्रिस्त त्याला संपूर्णतः स्वीकारतो. "हे खरे आहे जे कबुल करितात की त्यांना दिसत नाही, तेव्हा त्यांना दृष्टी दिली जाते. पण जे म्हणतात की त्यांना सर्व दिसते, येशू शिवाय सर्व पाहता येते, ते खरेपणाने आंधळे असतात.

**"मी इजिप्तमध्ये मुसलमान आहे तर, फ्रान्समध्ये कॅथॉलिक आहे. "(नेपोलियन बोनापार्ट)**

"नेपोलियनने हे धोरण आपल्या प्रस्थापित राज्यसत्तेसाठी होते, फ्रान्सचे धर्मगुरू आणि इजिप्तमधील मुस्लिम धर्मगुरू दोघ्यानाही विशेष अधिकार देऊन, आपल्या दोन व्यक्तिमत्वाने त्यांना खुश केले. "आजही असे काही ख्रिस्ती आणि पाळक आहे जे दुहेरी भूमिकेत दिसतात, चर्चमध्ये दूत आणि समाजात वावरतांना भूतांचे पेहेराव घेतात, आत्मिक लोकांना आपल्या खोट्या व्यक्तिमत्वाने मुरुड घालतात, असा लोकांना फक्त चर्चचा माध्यमातून आपली आर्थिक सत्ता गाजवायची असते. ज्याच्या व्यक्तिमत्वात ख्रिस्तची प्रतिछाया दिसत नाही आणि चर्चमध्ये पवित्रशास्त्राचा अधिकार संपताना स्पष्ट दिसतो, त्या मंडळीतील विश्वाशी लोकांनी सावधान राहावे.

**"त्यांच्या उपदेश एक तासाचा नसून तो जीवनभर पुरणारा असा होता. "(ई. एम. बाऊंड)**

प्रेषितांना उपदेशाची पूर्वतयारी करावी लागली नाही, कोणता प्रसंग येईल याची त्यांना पूर्वकल्पना नव्हती, खरे पाहता ते ख्रिस्ताचा महान आज्ञेने सुवेळी-अवेळी पवित्र आत्म्याने पेटलेले होते, म्हणनू त्यांचे

शब्द जिवंत होते जे कधी मेलेच नाही. * आज मंडळीत जेव्हा संदेश एकूण लोक घाई-घाईने बाहेर पडतात तेव्हा संदेश मंडळीतच सोडून जातात. याची काही विश्वाशी लोकांना कल्पना देखील नाही. देवाचे शब्द आपल्या जीवनात जिवंत आहे की मेलेले.

**पवित्रता तुमच्या शुद्ध मनाचे प्रतिबिंब आहे**

"पवित्र बनण्याविषयी जे युद्ध आहे ते तुम्ही मनातच हरू किंवा जिंकू शकता, दोन महत्त्वाच्या गोष्टी तुम्ही कराव्यात. एक म्हणजे-अशुद्ध विचारांपासून आपल्या मनाचे संरक्षण, दुसरी गोष्ट-चांगल्या व शुद्ध विचारांनी आपले मन भरणे. "(**जॉन मैकवाईड**)"आमचे मन हीच पवित्र जीवनाची किल्ली आहे. "म्हणून राजा सुलेमान सांगतो "सर्व रक्षणीय वस्तुपेक्षा आपल्या अंतःकरणाचे विशेष रक्षण कर, कारण त्यात जीवनाचा उगम आहे"(नितीवचन:-4-23), पवित्रता ही एक आज्ञा आहे आणि ज्याचे हृदय शुद्ध आहे, तोच व्यक्ती आपली पवित्रता टिकवू शकतो. फिलिप:-4-8:-आपल्या मनाला कसे शुद्ध ठेवावे याचे ज्ञान देते *"जे काही सत्य, जे काही आदरणीय, जे काही न्याय, जे काही शुद्ध, जे काही प्रशंसनीय, जे काही श्रवणीय, जो काही सद्गुण, जी काही स्तुती, त्याचे मनन कर"आज आपण जे मनन करू तेच आपले व्यक्तिमत्व घडविते, पाऊल आव्हान करतो आपणास शुद्ध राखा. (1तीमुथि:-5-22) तुम्ही पवित्र असा, कारण मी पवित्र आहे (1 पेत्र:-1-16).

**अविश्वासातून विश्वासाकडे**

"येशू सुरूवातीलाच पूर्ण विश्वासाची मागणी करत. अविश्वास असेल म्हणून त्याने कोणाला त्याचे शिष्य होण्यापासून रोखले नाही. * आजही त्याची तीच पद्धत आहे, तो त्याच्या बंधूच्या बाजूस असतो. कोणत्याही वेळी त्यांनी त्याच्याशी निगडित व्हावे हे तो पाहतो. तो त्यांना विश्वासाने पुढे नेत राहतो. ही सुरुवात त्याला समाधान देणारी वाटते. मग तो त्यांना पुढे नेत राहतो. हळूहळू तो कोण आहे याचे रहस्य त्यांना उलगडतो व शेवटी अत्यंत गौरवी अशा शिष्यत्वत त्यांना नेतो. "( **जेरी ब्रिजेश**) ख्रिस्त सुरुवातीला पूर्ण विश्वासाची मागणी करत नाही, उदाहरण पेत्राचे आणि थोमाचे आहे त्यांची अविश्वासातून विश्वासाकडे वाटचाल कशी झाली आपण पाहिलेले आहे, पूर्ण विश्वासाची मागणी जर ख्रिस्त आपल्याकडे करत नाही तर आपणही नवीन ख्रिस्ती लोकांना थोडा वेळ देऊन त्यांच्यात सुधारणा होण्यासाठी वेळ देने अगत्याचे आहे, आणि ख्रिस्त पूर्ण गौरवानिशी एक दिवस त्या विश्वासीला पूर्ण प्रकट होईल आणि देवाची महिमा होईल.

**ए. डब्ल्यू. पिंक {The Attributes of God}**

"देवाची पवित्रता वधस्तंभावर प्रगट झाली आहे. प्रायश्चित्त हे अदभूतपणे आणि गंभीरतेने देवाची अती पवित्रता आणि पापाचा तिरस्कार दाखवीते. देवासाठी पाप हे किती तिरस्करणीय आहे, कारण पापाला शिक्षा होण्याकरीता त्याला त्याच्या अति योग्य अशा पुत्राला शिक्षा द्यावी लागली; जेव्हा ते त्याच्या पुत्रावर लादले गेले!. . . स्वत:ला ख्रिस्ती म्हणविणारे बहुसंख्य लोक"देवा" कडे केवळ "प्रिती" म्हणून पाहतात; त्यांना जणू तो एका वृद्ध व्यक्तीसारखा जो अति लाड पुरवणारा, ज्या स्वत:ला मूर्खपणा ठाऊक नाही,

तर उलट तो त्याच्या तरुणपणातील “अविवेकबुद्धी” वर डोळा मिचकवतो वाटतो. परंतु वचन म्हणते, “सर्व कुकर्म करणाऱ्यांचा तुला तिटकारा आहे” (स्तोत्र ५:५). आणि पुन्हा वचन म्हणते, “तो प्रतिदिनी कुकर्म करणाऱ्यांवर रोष दाखवणारा देव आहे” (स्तोत्र ७:११). परंतु माणसे अशा देवावर विश्वास ठेवण्यासाठी नकारतात, आणि जेव्हा पापाविरुद्ध असलेला त्याचा द्वेष प्रखरतेने त्यांच्या लक्षात आणून दिला जातो; तेव्हा ते क्रोधाविष्ट होऊन दातओठ खाऊ लागतात. लक्षात ठेवा! कोणीही पापी व्यक्ती पवित्र देवाच्या हातून सुटू शकत नाही तर उलट जो नर्क अग्नीचा सरोवर त्यासाठी सिद्ध केला आहे तेथे तो अनंतकाळ आणि सदासर्वदा यातना भोगील. ”

**बोलण्याचे कृत्य नाही, आत्मिक फळे ख्रिस्ती व्यक्तीची साक्ष देतात:-**

"पवित्र भूमीत शेतात आढळणारे गवत असते, ते विषारी गवत गव्हापासून वेगळे ओळखता येत नाही, त्यांची पाने सारखीच दिसतात परंतु त्यांना कणसे आली म्हणजे ते वेगळी करिता येतात. "(**रेव्ह अनगर**) इथे कणसे म्हणजे फळ एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून जेव्हा तुम्हीं देवाच्या राज्यासाठी कार्य करतात, आणि त्या कार्यातुन जे परिणाम घडून येतात ते परिणामच तुमची खरी ओळख दर्शवितात की तुम्ही ख्रिस्ती आहात की ख्रिस्तविरोधी, बोलण्याने जर कोणी ख्रिस्ती होत असेल तर आज जगात 30/. लोकसंख्या ख्रिस्ती धर्माची आहे. बोलण्याने नाही तर एक सर्वोच ख्रिस्ती व्यक्ती त्याच्या जिवनातील योग्य फळांनी ओळखला जातो. **एच सी वृडिंग** लिहितो "त्यांनी फक्त पाहण्याची क्रिया केली, म्हणजे दैवी सत्याची फक्त ओळख करून घेतली. परंतु जो सत्याचा मूर्त अवतार त्याच्यासमोर उभा होता त्याला पाहण्यासाठी मात्र त्यांनी पूर्ण नकार दिला, ते देवाचा शब्द ऐकण्याची क्रिया करीत होते, परंतु देवाच्या जिवंत शब्द त्यांच्यामध्ये हजर होता त्याला त्यांनी मानले नाही, येशूचा मानवी अवताराची ओळख करून घेण्यास ते तयार नव्हते, म्हणून त्याची समजण्याची शक्ती त्यांच्यापासून काढून घेण्यात आली. येथे यहुदी, सदुकीआणि फरुसी बद्दल लिहिले आहे, त्यांनी ख्रिस्ताला फक्त पाहिले पण त्याच्या आज्ञा पाळल्या नाहीत, देवाचा व्यक्ती जो प्रयन्त ख्रिस्ताशी आज्ञाधारी राहत नाही तो प्रयत्न तो आत्मिक फळे देऊ शकत नाही. आज जे ख्रिस्ती व्यक्ती फळे देण्यास नाकारकर्ते होतील. त्याच्याकडून देवाची राज्याची समजशक्ती काढण्यात येईल.

**"माझ्या जीवनाचे प्रमुख अंग काय आहे?**

*“जेव्हा देव राष्ट्राचा न्याय करू इच्छितो तेव्हा तो त्यांना दुष्ट शासक देतो -* ***जॉन कॅल्विन***

"वचन ऐकून ते ग्रहण केले, तर मला केवळ ते ऐकण्याचा आनंद मिळतो असे नाही, पण ते माझे स्वतःचे होते, माझ्या जीवाचे अंग बनते, तेव्हा अधिक मिळण्याची माझी क्षमता वाढते. "( **डर्बि** )देवाचे वचन ऐकणे ही किरकोळ बाब नाही. जे वचन ग्रहण करितात ते पूर्वीपेक्षा अधिक जबाबदार धरले जातील, जे उपदेशाकडे दुर्लक्ष करितात किंवा आज्ञापालन ऐच्छिक आहे असे समजता ते स्वतःची हानी करून घेतात. परंतु जर त्यांनी वचन ग्रहण करून पाळले, तर त्यांना अधिक प्रकाश मिळतो. जे वचन ग्रहण करून पाळतात ते नेहेमी देवाचा राज्यासाठी तत्पर आणि तयार असतात. **प्रो. केली** लिहितो _"देवाचा

व्यक्तीने सर्व जगिक गोष्टीपासून मुक्त असावे, म्हणजे प्रभू दार ठोकली तेव्हा तत्परतेने त्यांनी दार उघडावे. दुर्लक्ष न करीत काळजीपूर्वक तयार असावे, आपल्या प्रभूची त्यांनी वाट पाहावी, जे वाट पाहतात, त्यांचे त्याच्यावर प्रेम आहे, येशू दार ठोठावतो व ते लगेच दार उघडतात. "

*"ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनाची वाट पाहणे. यापेक्षा जगात कोणतीच आशा मोठी नाही. ''**देवाच्या राज्यांचे (सत्य) रहस्य माहीत नसलेले संदेष्टे आणि ख्रिस्ती, बिलाम सारखे आहे, जे मंडळीसाठी प्रार्थना आणि कार्य करतांना तर दिसतात. पण ते विसरतात की त्यांनी बालामाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी स्वतःचा आत्मा होम केलेला आहे. ''***

**"दिसणाऱ्या जखमा पाहून न दिसणाऱ्या देवत्वावर विश्वास ठेवला. "_( जॉन बॉईज )**

*''कारण त्याची प्रिती कधीही अपयशी होऊ शकत नाही. म्हणून, तो आपल्या जीवनात केवळ त्याच दुःखांना आणि यातनांना परवानगी देतो. ज्या आपल्या खास कल्याणार्थ आहेत. "**जेरी ब्रिजेस***

खात्रीचा पुरावा म्हणजे देवाचे वचन. * जर देव एक गोष्ट बोलतो, तेव्हा विश्वास ठेवून आपण त्याचा आदर करितो. पण अधिक पुरावा मागितला तर आपण त्याचा अनादर करितो. तो म्हणतो यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे, कारण तो लबाडी करित नाही व चूकही करीत नाही. "खेर पाहता थोमाने विश्वास ठेवला तो येशूला समाधान कारक नव्हता कारण त्याने पाहिल्यावर विश्वास ठेवला, परंतु जे न पाहता विश्वास ठेवतात ते धन्य. पूर्णविश्वास किंवा खरा विश्वास हा देवाचा आदर आपल्या जीवनात निर्माण करतो, कारण खरा विश्वास कृपेद्वारे देवाकडून आपल्यांना मिळतो, आणि त्याच्या उपयोग फक्त देवाचा महिमेसाठी होतो, कारण अविश्वास देवाचा अनादर निर्माण करतो. "आज मंडळीत सर्वात जास्त कशावर भर दिला जातो जखमांवर की ख्रिस्तावरील खऱ्या विश्वासावर. '

**राज्यातील नागरिकांचे आदर्श:-**

"मानवजातीचे अगदी यथायोग्य वर्णन हे आशिर्वाद उलट करून समजून घेतल्यावर म्हणता येईल की पाहा ही तुमची मानवजात आहे. " **(ए डब्लू टोजर**) टोजर म्हणतात त्या प्रमाणे मनुष्यजातीचे वर्णन योग्य आहे, पण एक देवाच्या राज्याच्या व्यक्ती कसा आदर्श आहे याचे वर्णन ख्रिस्ताने धन्यताये जी दिलेली आहे त्यात केलेले आहे. म्हणून **विलियम मैकडोनाल्ड** लिहितात"राजाने त्याच्या लोकांचे वर्तन व शील कसे असावे याचा गोषवारा दिला मत्तय:5व्या अध्यायात दिले आहे. ''

1) जे आत्म्याने दीन ते धन्य:- कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे;आत्म्याने दिन असलेले लोक स्वतः हतबल असून सर्वस्वी देवावर अवलंबून असतात, त्याची आत्मिक गरज काय हे त्यांना समजते आणि ते प्रभूमध्ये ती भागविली जाईल असा विश्वास ते धरतात, *आपल्या मागण्यांच्या ते दिंडोरा वाजवत नाही*

2) जे शोक करितात ते धन्य:-कारण त्यांना शांती प्राप्त होईल;येशूच्या सानिध्यात आल्यामुळे होणारा तो शोक आहे, जगातील दुःख आणि पाप हे येशूबरोबर प्रत्यक्ष वाटून घेतांना होणारा तो शोक आहे.

3) जे लिन ते धन्य:-कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे;स्वभावाने हे लोक चंचल असू शकतात, चिडखोर, उद्धाम असू शकतात, पण ख्रिस्ताचा आत्मा हेतुपुरस्सर स्वीकारल्यामुळे ते आता लिन किंवा नम्र होतात.

4) जे धर्माचे भुकेले व तान्हेले ते धन्य:-कारण ते तृप्त होतील;खरे पाहता ते ख्रिस्तात विलीन होतील, **गमलिएल ब्रॅडफिर्डने** लिहिले आहे "जगातील कोणताही झरा त्याची तहान भागवत नाही, ते ख्रिस्तासाठी भुकेले असतात अन्यथा ते मरण पत्करितात"

5) जे दयाळू ते धन्य:-कारण त्यांच्यावर दया करण्यात येईल;जर कोणी दयाळू नसेल तर त्याजवर दया केली जाणार नाही, म्हणजे त्याचे प्रतिफळ त्यानुसार कमी करण्यात येईल.

6) जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य:-कारण ते देवाला पाहतील;याचा अर्थ म्हणजे *जे अंतःकरणाचे शुद्ध ते आताच देवाच्या वचनात व आत्म्यात राहून देवाला पाहतील. *

7) जे समेट करणारे ते धन्य:-कारण ते देवाची मुले म्हणून ओळखली जातील;लक्षात ठेवा की जे स्वतः शांतीत राहत शांतीप्रिय आहेत त्याच्याबद्दल प्रभू हे म्हणत नाही, परंतु जे सक्रियपणे शांती प्रस्थापित करितात त्यांच्याविषयी तो असे म्हणतो.

8) देवाच्या राज्यासाठी ज्यांचा छळ होतो ते धन्य :-कारण देवाचे राज्य त्याच्यासाठी आहे;ख्रिस्तासाठी दुःख भोगणे हे आनंदाचे कारण आहे, संकटसमयात उपदेशकांचे सहकारी होणाऱ्या साठी मोठे प्रतिफळ राखलेले आहे.

मग देवाचे नागरिक होण्याच्या मान मिळवण्यासाठी कोण तयार आहे; कारण ज्याने आपले कार्य पूर्ण केलेले आहे, जीवनाचा मुकुट त्याच्यासाठीच आहे.

**"देवाचे संकल्प निष्फळ होत नाही"**

"परंतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती कसरणाऱ्यास म्हणजे त्यांच्या संकल्पनाप्रमाणे बोलावलेल्यास देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात. "रोम. 8:28)

**ओक्टेव्हियस विंस्लो** म्हणतात _"स्पष्टपणे उघड केलेले जोरदार सत्य आहे की देवाच्या लोकांच्या जीवनातील देवाच्या कारभारामूळे जे काही घडते ते सर्व एकत्रितपणे सिद्दीस जाते, ते परिणामकारक असते, त्यांचे ते अत्युच्च कल्याण करून त्यांना महान आनंदाने भरते, देवाच्या मुलाच्या जीवनाच्या इतिहासात एकाकी, अत्यंत उदास, यातनादायी परिस्थिती त्याचे कायमस्वरूपी कल्याण करण्यासाठी एकत्रितपणे कार्यरत असते. "देवाच्या कार्यात आलेले अडथडे हे एका ख्रिस्ती व्यक्तीला देवाचा राज्यातील राजपथावरील मार्गात चालण्यास मदत करते.

**पवित्रता तुमच्या शुद्ध मनाचे प्रतिबिंब आहे**

"पवित्र बनण्याविषयी जे युद्ध आहे ते तुम्ही मनातच हरू किंवा जिंकू शकता, दोन महत्त्वाच्या गोष्टी तुम्ही कराव्यात. एक म्हणजे-अशुद्ध विचारांपासून आपल्या मनाचे संरक्षण, दुसरी गोष्ट-चांगल्या व शुद्ध विचारांनी आपले मन भरणे. "(**जॉन मैकवाईड**) "आमचे मन हीच पवित्र जीवनाची किल्ली आहे. "म्हणून राजा सुलेमान सांगतो "सर्व रक्षणीय वस्तुपेक्षा आपल्या अंतःकरणाचे विशेष रक्षण कर, कारण त्यात जीवनाचा उगम आहे"पवित्रता ही एक आज्ञा आहे आणि ज्याचे हृदय शुद्ध आहे, तोच व्यक्ती आपली पवित्रता टिकवू शकतो. फिलिपः-4-8:-आपल्या मनाला कसे शुद्ध ठेवावे याचे ज्ञान देते "जे काही सत्य, जे काही आदरणीय, जे काही न्याय, जे काही शुद्ध, जे काही प्रशंसनीय, जे काही श्रवणीय, जो काही सद्गुण, जी काही स्तुती, त्याचे मनन कर" आज आपण जे मनन करू तेच आपले व्यक्तिमत्व घडविते, पाऊल आव्हान करतो *आपणास शुद्ध राखा. (1तीमुथि:-5-22) तुम्ही पवित्र असा, कारण मी पवित्र आहे.

**जसे नाव तसे काम, ही मन ख्रिस्ती लोकांना लागू होते का?:-**

"श्रेष्ठ सम्राट सिकंदरकडे 'सिकंदर' नावाचा एक साधा सैनिक होता तो अतिशय आळशी सुस्त व बेजबाबदार होता. जेंव्हा सम्राट सिकंदरला ही गोष्ट समजली, तेंव्हा त्याने शिपायाला बोलावून अतिशय कठोरतेने आज्ञा देऊन बजावले की एकतर आपले नाव बदलून टाक किंवा आपले वागणे सुधार आळस झटक नाहितर तुझ्यामूळे माझ्या नावाची निंदा होईल कारण तो शिपाई सिकंदर नाव धारण करण्यास लायक नव्हता"(**थॉमसन-बी-थॉमस**)"आज अनेक ख्रिस्ती लोकांची नावे, पौल, पीटर, योहान, याकूब, मुसा, मरियम, हंना, सॅम्युएल, हानोख, अशी न मोजता येणारी देवाच्या राज्याची खऱ्या सुरवीरांची नावे आहे, काही-काही तर ख्रिस्ताला स्वीकारल्यावर लगचे स्वतःपुढे ख्रिस्त या नावाची पदवी लावून घेतात, ही नावे धारण करणे चुकीचे नाही, पण नावाप्रमाणे स्वतःला समजणे चुकीचे, आहे तुम्ही अब्राहामाची आत्मिक मुले होऊ शकतात पण अब्राहाम नाही, तुम्ही पौल सारखे सुवार्ता देऊन शकतात, पण पौल नाही बनू शकत, तुम्ही मंडळीत आत्मिक पित्याचे मन धारण करू शकता. पण आत्मिक पिता केवळ स्वर्गात आहे, तुम्ही नाही, **ख्रिस्तत्वाचा मुखवटा घालून कोणी देवाला फसवू शकत नाही. आज ख्रिस्ताचा नावावर आपल्या स्वार्थाची पोळी शेकणारे भरपूर आहे, पण *सिकंदराचा दरबारात जसा त्याचा सैनिक सिकंदर नावाचा होता पण तो सिकंदर नव्हता, तसेच आज भरपूर ख्रिस्ती मंडळ्या आणि व्यक्ती ख्रिस्ताचा दरबारात आहे, त्यांनी ख्रिस्त हे नाव धारण केलेले आहे, म्हणनू त्यांना ख्रिस्तत्व प्राप्त होत नाही. तर हे फक्त दरबारी सैनिक आहे सिकंदर या सैनिकाप्रमाणे आळशी, सुस्त, आणि कामचोर, जे ख्रिस्ती होण्यास लायक नाही असे लोक देवाच्या नावाची निंदा बनतात.

**मन शुद्ध ठेवण्यासाठी जॉन मैकॉइड यांची पाच सूत्रे:-**

*"ख्रिस्ती समाजात असे पुष्कळजण आहेत की ते आपल्या आयुष्यभर विलाप करीत असतात. "मज पाप्यावर दया कर"पण खऱ्या विश्वाशियासाठी अशारितीने रडत बसण्याची गरज नाही. तो देवाचे लेकरू झाला आहे, त्याची देवावर पूर्ण खात्री आहे, अशा प्रकारचा भरवसा असणे हे देवाचे लेकरू झाल्याचेच चिन्ह आहे. "*

1) :-तुमचे डोळे व कान हे तुमच्या मनाचे प्रवेशद्वार आहेत, म्हणून तुम्ही काय पाहता व काय ऐकता या विषयी दक्षता घ्या. डोळे शुद्ध असणे म्हणजे संपूर्ण शरीराची शुद्ध चारित्र्यात्मक प्रगती, आणि आत्मिक जीवनाची पवित्रता.

2):-मित्र म्हणून विश्वासी व्यक्तीची निवड करा, जे प्रत्येक क्षेत्रात देवाची आज्ञा पाळू इच्छितात. चांगल्या लोकांबरोबर आपला वेळ घालवा. देवाच्या व्यक्तीने देवाच्या मंडळीबरोबरच ख्रिस्ती व्यक्तीच्या सानिध्यात राहून एकमेकांची आत्मिक प्रगती घडवून आणण्यात एकमेकांची मदत करावी.

3):-चांगली ख्रिस्ती पुस्तके घ्या, ती वाचा, ही पुस्तके तुम्हास विश्वासात वाढण्यास मदत करतात. पवित्रशास्त्रा बरोबर ख्रिस्ती लेखकांची पुस्तके वाचणे अगत्याचे आहे, हे लेखक देखील पवित्र आत्म्याच्या प्रेरणेनेच ही पुस्तके लिहीत असतात, आणि ही पुस्तके आपली बोद्धीक आणि आत्मिक वाढ करण्यास कारणीभूत ठरतात.

4):-तुमचे मन व विचार अशुद्ध करतील अशा गोष्टी पाहू नका. या दृश्य जगात चांगल्या गोष्टीपेक्षा वाईट दृश्याच्या भरणा जास्त आहे, एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून मी रोज काय पाहतो, आणि पाहून काय विचार करतो, यावर ख्रिस्ती व्यक्तीचे व्यक्तिमत्व शुद्ध आहे की अशुद्ध आहे ते ठरत असते.

5):-जर तुमचे शर्ट खराब झाले तर ती मोठी समस्या होत नाही. कारण तुमचे शर्ट धुता येते, आणि ते पुन्हा स्वच्छ होते, परंतु जर तुमचे मन खराब झाले तर ती मोठी समस्या बनते;कारण तुमच्या मनातील अशुद्ध विचारांना कल्पनांना व चित्रांना कशानेही धुता येत नाही, आणि असे विचार, चित्रे तुम्हास अनेक वर्षे त्रास देऊ शकतात. तेव्हा स्वतःस शुद्ध राखा. हे जग स्वप्नाळू आणि भौतिक गोष्टीत गुंतून ठेवणारे असे आहे, ज्यात स्वतःला शुद्ध ठेवण्यासाठी ख्रिस्ती व्यक्तीने रोज आपल्या मनाची, आत्म्याची आणि विवेकाची चौकशी करून स्वतःमध्ये सुधारणा घडवून आणावी. "जो ख्रिस्ती व्यक्ती आपल्या जीवनात रोज सुधारणा घडवून आणण्यात निष्फळ ठरतो, तो दुसऱ्यांच्या जीवनात आत्मिक सुधारणा कशी घडवून आणू शकतो.

**एक ख्रिस्ती म्हणून मला पूर्ण खात्री आहे:-**

"ख्रिस्ती विश्वासी जीवनाच्या सुरुवातीचे उबदार, आज्ञाधारी, देवाच्या वचनास प्रतिसाद देणारे हृदय हे परिवर्तन झालेल्या जीवनाचा पुरावा व कृपेचे प्रमुख लक्षण आहे. दुर्दैवाने काळाच्या ओघात विश्वासणाऱ्याच्या जीवनातून पहिली प्रीती निघून गेली व काळानुसार थंडपणा व अवज्ञा या गोष्टी त्यांच्या जीवनातून प्रगट होऊ लागल्यात. हा गंभीर व अंतःकरणाला वेदना देणारा असा दोष आहे. "("**पीटर मास्टर**")

एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणुन मी माझ्या डोळ्यांना शुद्ध ठेवितो. एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून मी माझ्या हृदयाला स्वच्छ ठेवितो.

एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून *मी माझ्या हाताला वाईटापासून दूर ठेवितो.

एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून *मी माझ्या होटांची चौकशी रोज करितो.

एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून *मी माझी पावले देवाच्या मार्गावर नेतो.

एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून *मी माझ्या वेळ प्रार्थनेत आणि पवित्रशास्त्राचा सानिध्यात घालवतो.

एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून *मी माझे महत्वपूर्ण शब्द ख्रिस्ताची सुवार्ता सांगण्यात खर्च करितो.

एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून *मी माझे अस्तित्व आणि व्यक्तित्व ख्रिस्तात जगण्यात घालवीत असतो.

एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून मला तारणाची पूर्ण खात्री आहे, आणि हाच माझा विश्वास आहे जो देवाकडून मला अनंतकाळासाठी मिळालेला आहे.

## संदर्भग्रंथसूची:-

**१) असे होते विल्यम कैरी, डॉ. अरुण. गद्रे, राजहंस प्रकाशन, प्रथमावृत्ती. पुणे. २००९. पृ क्र-९४**
**२) डॉ हेन्री थॉमस, मानवजातीची कथा, पृ क्र-१६१-१६२)**
**३) , वचनापासून लाभ, आर्थर-डब्लू-पिंक लव्ह महाराष्ट्र. पुणे, २०१५ प्रथमावृत्ती. २०१८ पृ क्र-17-18**
**४) देवावर विश्वास. जेरी ब्रिजेस. अनु. क्रोसि उर्टेकर अलेथिया प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०१७, नाशिक**
**५) देवाचे गुणविशेष, आर्थर डब्लू पिंक. अनु क्रोसि उर्टेकर, लव्ह महाराष्ट्र. प्रथमावृत्ती. पुणे २०१८**
**६) नितीवचन:-4-23. जुना करार. पवित्र बायबल.**
**७) पेत्राचे पहिले पत्र:-1-16, नवा करार. पवित्र बायबल**